दैनिक
# जळगाव वृत्त

रविवार, २६ जानेवारी २०२५ | मुंबई/ठाणे | दैनिक जळगाव वृत्त | ४

# ठाण्यातील समारोह बॅंक्वेट्स येथे राष्ट्रीय मतदार दिन उत्साहात साजरा

## मतदार नोंदणी अन् मतदान करून देशाप्रति आपली कर्तव्यपूर्ती करावी–जिल्हाधिकारी अशोक शिनगारे

**ठाणे** प्रतिनिधी

मतदानासारखे काहीच नाही, मी मतदान नक्की करेन या घोषवाक्याला स्मरून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीपूर्वी मतदार नोंदणी करून घ्यावी, मतदान नक्की करावे आणि देशाप्रति आपली कर्तव्यपूर्ती करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांनी येथे केले.

१५व्या राष्ट्रीय मतदार दिन निमित्त येथील समारोह बॅंक्वेट्स येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

जिल्हाधिकारी श्री. शिनगारे पुढे म्हणाले की, आपण सर्व प्रगल्भ लोकशाही असलेल्या देशाचे नागरिक आहोत, याचा आपल्याला अभिमान आहे. मतदारयादीत समाजातील प्रत्येक घटकाचा समावेश असावा, हे अत्यंत महत्त्वाचे आहे. आपण ठाणे जिल्ह्यात विविध संस्थांच्या, व्यक्तींच्या एकत्रित सहकार्याने मतदान जनजागृतीचे आणि निवडणुकीचे कार्य उत्तमरित्या करू शकलो. यामध्ये सर्वसामान्यांपासून ते किन्नर, दिव्यांग यांचेही मोलाचे योगदान मिळाले आहे. याबद्दल मी त्यांचा कायम ऋणी आहे.

२५९ बेघर व्यक्तींची मतदार नोंदणी करून त्यांना लोकशाहीने दिलेला अधिकार बजाविण्याची संधी आपण देवू शकलो. तळागाळातील लोकांना, देहविक्रय करणाऱ्या महिलांना तसेच इतरही काही उपेक्षित घटकांना मतदान प्रक्रियेच्या माध्यमातून लोकशाहीच्या मुख्य प्रवाहात आणू शकलो, याचे मनस्वी समाधान आहे, असे ते म्हणाले.

नवमतदारांमध्ये आपण योग्य ती जाणीव जागृती करून त्यांनाही मतदनाचे महत्त्व पटवून देण्यात यशस्वी ठरलो, असे सांगून त्यांनी नवमतदार नोंदणीसाठी



जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केलेल्या कार्याबद्दल त्यांचे विशेष अभिनंदन केले आणि या वर्षात आपण नवमतदार नोंदणी मध्ये पहिल्या क्रमांकावर येण्याचा संकल्प करूया, असे आवाहन केले.

श्री.शिनगारे म्हणाले की, ठाणे जिल्ह्याची लोकसंख्या साधारण एक कोटीच्या आसपास असून आतापर्यंत जवळपास ७२ लाख २९ हजार मतदार नोंदणी पूर्ण झाली आहे. यापैकी १८ ते १९ या वयोगटातील आणि २० ते २९ या वयोगटातील मतदार नोंदणी अधिक जोमाने करण्यात येईल. या घटकांवर विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. ज्या मतदारांचा निवासस्थानाचा पत्ता बदललेला आहे, त्यांनी निवडणूक प्रशासनाशी संपर्क साधून आपला तपशील अद्ययावत करून घेणे, ही प्रत्येक मतदाराची जबाबदारी आहे. मतदान दिवसाकडे सुट्टीचा दिवस म्हणून पाहू नये तर मतदान करावे. भारत निवडणूक आयोगाने प्रसारित केलेले मै भारत हू.. हे गीत सर्व भारतीय मतदारांसाठी प्रेरणादायक ठरले आहे.

आजचा नवयुवक हा संवेदनशील आहे, जागरूक आहे. आपला देश अत्यंत सुरक्षित हाती आहे. ही पिढी देशाला सूवर्णकाळ प्राप्त करून देईल, यात शंका नाही. आजची तरुणाई ही आपल्या देशाची शक्ती आहे. भारत देशाची वाटचाल यामुळे विकसनशील देशाकडून विकसित देशाकडे सुरू झाली आहे. नुकताच मुख्यमंत्री महोदयांनी शंभर दिवसांचा कृती आराखडा प्रशासनासाठी जाहीर केला आहे. ठाणे जिल्हा सर्वसामान्य जनतेसाठी लोकाभिमुख सेवा देण्याच्या उद्देशाने आखलेल्या या कृती आराखड्याची निश्चित यशस्वीपणे अंमलबजावणी करेल, यात शंका नाही, असे जिल्हाधिकारी श्री.शिनगारे शेवटी म्हणाले.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने बित्तंबातमी वृत्तपत्राचे संपादक तथा मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, ठाणे भूषण तथा सरस्वती विद्या प्रसारक ट्रस्ट, ठाणेच्या अध्यक्षा श्रीमती मीरा कोरडे, चित्रपट दिग्दर्शक नितीन कांबळे आणि अभिनेत्री अश्विनी चवरे यांनी आपले मनोगत व्यक्त करून राष्ट्रीय मतदार दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. या सर्वांनी सशक्त लोकशाहीसाठी मतदार नोंदणी आणि मतदानाचे महत्व पटवून दिले. तसेच लोकशाही टिकविण्यासाठी निवडणूक यंत्रणा व प्रशासन घेत असलेल्या अथक परिश्रमांसाठी त्यांचे कौतुक केले.

# अस्तिका समाज, माटुंगा, मुंबई भगवान कार्तिकेय स्वामी यांच्या सहयोगाने अष्टबंधन महा कुंभाभिषेकमचे आयोजन

**मुंबई,** प्रतिनिधी

अस्तिका समाज भगवान कार्तिकेय स्वामी हे मंदिर १०२ वर्षांपासून माटुंगा, मुंबईत स्थापित असून याची प्रसिद्धी सर्व दूर पसरलेली आहे. आजपर्यंत अनेक भाविक भक्तांनी दर्शन घेऊन आशीर्वाद घेतला आहे. मंदिरात रोज पूजा असते, आशीर्वादासाठी अनेक भक्तांची रिघ लागलेली असते.

अस्तिका समाजने भाविकांची मनोकामनापूर्ती होण्यासाठी दिनांक २७ जानेवारी ते २ फेब्रुवारी २०२५ ह्या सात दिवसांत अष्टबंधन कुंभाभिषेकमचे आयोजन केले आहे. अष्टबंधन महाकुंभाभिषेक हा १२ वर्षांतून एकदा येणारा अत्यंत आध्यात्मिक महत्त्व असलेला वैदिक विधी आहे. हे मंदिराच्या देवतांच्या पुनर्संवर्धनाचे आणि गोपुरम (बुरुज) च्या पवित्रीकरणाचे प्रतीक आहे, मंदिराच्या आध्यात्मिक आभाला पुन्हा ऊर्जा देते. प्रत्येक बारा वर्षानंतर येणारा हा योग आहे. यावर्षी भक्तांना ही संधी मिळत आहे.

सर्वसाधकम् शिवगमरथनम, शिवगमकलानिधी, शिवश्री – आर. सेल्वम भट्टर (उर्फ) कल्याणसुंदरशिवाचार्य आणि त्यांच्या ५० शिष्यांसह महा कुंभाभिषेक करणार आहेत.

ह्या सात दिवसात होणाऱ्या पूजा : भगवान श्रीमहागणपती, भगवान श्री शिव, भगवान श्री कार्तिकेय स्वामी आणि नवग्रह देवता या चार पूजा संपन्न होणार आहेत. देवतांसाठी हा महाकुंभभिषेक केला जाईल, ज्यात देशभरातून आणि बाहेरून हजारो भाविक उपस्थित राहतील. तसेच

होमम (अग्नी विधी): प्रसिद्ध वैदिक विद्वानांनी केले जाणारे, हे विधी सार्वभौम शांती आणि समृद्धीसाठी दैवी आशीर्वाद देतात. पूजा: प्रमुख देवतांना समर्पित दैनिक महाकुंभभिषेकमची विस्तृत पूजा. अन्नदानम (अन्न वितरण): मोफत प्रसादम (पवित्र अन्न) हजारो भक्तांना ईश्वरी सेवा आणि समाज कल्याणाचे कार्य म्हणून दिले जाते. प्रत्येक दिवशी अन्नदान करण्यात येणार आहे.

२७ जानेवारीची पूजा सकाळी ०६. ३० ते ११. ०० पर्यंत व संध्याकाळी ०६ ते ०८. ३० पर्यंत, २८ जानेवारी – सकाळी ०८. ३० ते ११. ०० व संध्याकाळी ०६.०० ते ०८. ३० पर्यंत, २९ जानेवारी –सकाळी ०७.२५ ते ११.०० व संध्याकाळी ०६.०० ते ०८.०० पर्यंत, ३० जाने. सकाळी ०८.३० ते ११.०० व संध्याकाळी ०५.३० ते ०९.०० पर्यंत, ३१ जाने. सकाळी ०८.३० ते ११.३० व संध्याकाळी ०६.०० ते ०८.३० पर्यंत, १ फेब्रुवारी – सकाळी ०८.३० ते ११.३० व संध्याकाळी ०६.०० ते ०८.३० पर्यंत, २ फेब्रुवारी सकाळी ०७. ०० ते १०.०० व संध्याकाळी ०४.०० ते ०६.३० वाजेपर्यंत भक्तांनी सर्व पूजेस उपस्थितीत राहून आशीर्वाद घ्यावा अशी विश्वस्त श्री. परमेश्वर अय्यर यांनी विनंती केली आहे.

# डोंबिवली, कल्याणमध्ये घुसखोर बांग्लादेशी नागरिक अटक

**कल्याण** प्रतिनिधी

डोंबिवली आणि कल्याण शहराच्या विविध भागात राहत असलेल्या घुसखोर बांग्लादेशी नागरिकांना डोंबिवलीतील मानपाडा पोलीस आणि महात्मा फुले पोलीस ठाण्यातील विशेष पथकाने सापळे लावून गुरुवारी अटक केली. कोणत्याही कागदपत्रांविना भारतात घुसखोरी करून हे पाच बांग्लादेशी डोंबिवली, कल्याण शहरात राहत असल्याचे पोलीस तपासात उघड झाले.

डोंबिवली पूर्वेतील शिळफाटा रस्त्यावरील टाटा पॉवर देशमुख होम्स शेजारी असलेल्या गांधीनगर झोपडपट्टीत चार बांग्लादेशी घुसखोर, कल्याण पश्चिमेत रेल्वे स्थानक भागात बांग्लादेशी नागरिक राहत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या आदेशावरून मानपाडा, महात्मा फुले पोलीस ठाण्याची स्वतंत्र पथके तयार करून या बांग्लादेशी नागरिंकना अटक करण्याचे नियोजन करण्यात आले.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर साबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली गांधीनगर झोपडपट्टी, रेल्वे स्थानक भागात एका वेळी पोलिसांच्या विशेष पथकाने कारवाई केली. या कारवाईत डोंबिवलीतील देशमुख होम्स शेजारील गांधीनगर झोपडपट्टीतून चार बांग्लादेशी घुसखोर, कल्याण रेल्वे स्थानक भागातून




एक बांग्लादेशी नागरिक अटक करण्यात आला.

या बांग्लादेशी नागरिकांकडे भारतात वास्तव करण्यासाठीची आवश्यक कागदपत्रे पोलिसांनी मागितली. ती त्यांना दाखविता आली नाहीत. हे पाच बांग्लादेशी भारतात विनापरवाना, बेकायदेशीर राहत असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी त्यांना अटक करून त्यांच्यावर मानपाडा, महात्मा फुले पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले. यामध्ये चार महिला आणि एक पुरूषाचा समावेश आहे. परकिय नागरिक कायदा कलमाने त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. गेल्या महिनाभरात पोलिसांनी कल्याण, डोंबिवली परिसरातून सुमारे २५ हून अधिक घुसखोर बांग्लादेशी नागरिकांवर कारवाई केली आहे. बहुतांशी बांग्लादेशी नागरिक चाळी, झोपडपट्टी भागात राहत आहेत. ते मजुरी, चालक म्हणून काम करतात. महिला शहर परिसरातील बारमध्ये सेविका (वेटर) म्हणून काम करत असल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे.

# लीलावती हॉस्पिटलने मुंबईत नवीन अत्याधुनिक कर्करोग उपचार संस्थेची घोषणा

**मुंबई ।** प्रतिनिधी

भारत: लीलावती हॉस्पिटलने मुंबईत ३०० खाटांचे हॉस्पिटल असलेल्या नवीन कर्करोग उपचार संस्थेच्या स्थापनेची घोषणा केली. ही अत्याधुनिक सुविधा नवीनतम तंत्रज्ञान, प्रगत उपचार आणि ऑन्कोलॉजीमधील जागतिक सर्वोत्तम उपचारांचा मार्ग उघडून भारतातील कर्करोगाच्या उपचारात क्रांती घडवून आणण्यासाठी सज्ज आहे.

नवीन कर्करोग उपचार संस्था रुग्ण केंद्रित घटकांवर आधारित तयार केलेले उपचार देईल, ज्यामुळे प्रत्येक रुग्णाला व्यक्तिगत आणि प्रभावी उपचार मिळतील याची खात्री होईल. स्थानिक पातळीवर प्रदान केलेल्या उच्च गुणवत्तेच्या उपचारांमुळे रुग्णांना उपचारांसाठी परदेशात जाण्याची गरज भासणार नाही ज्यामुळे वेळ आणि खर्च दोन्ही वाचतील.

अपवादात्मक रुग्ण सेवा प्रदान करण्याव्यतिरिक्त, ही सुविधा आरोग्यसेवा व्यावसायिक, संशोधक आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांसाठी असंख्य नोकरीच्या संधी निर्माण करेल. समाजातील ही महत्त्वपूर्ण गुंतवणूक स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देईल आणि मुंबईतील आरोग्यसेवा क्षेत्राच्या एकूण विकासात योगदान देईल.

कर्करोग उपचार संस्था कर्करोगाच्या जलद आणि अचूक निदानासाठी, रुग्णांच्या निकालांमध्ये सुधारणा करण्यासाठी आणि जगण्याचा दर सुधारण्यासाठी एआय-चालित निदान उपकरणे तयार करेल. शिवाय, लीलावती हॉस्पिटल समाजाला कर्करोगाची जोखीम, लक्षणे आणि प्रतिबंधात्मक उपायांबद्दल शिक्षित करण्यासाठी जागरूकता मोहिमा सुरू करेल, ज्यामुळे आरोग्य आणि निरोगीपणाची संस्कृती निर्माण होईल.

लीलावती हॉस्पिटलला मेयो क्लिनिकसोबत नर्सिंग एक्सलन्स प्रोग्राम सुरू करण्यासाठी सहकार्याची घोषणा करण्याचा आनंद होत आहे. या सामंजस्य कराराचा (एमओयू) उद्देश विशेष प्रशिक्षण आणि विकासाद्वारे आमच्या नर्सिंग कर्मचाऱ्यांचे कौशल्य आणि ज्ञान वाढवणे आहे. या भागीदारीमध्ये नर्सिंग एक्सलन्स शिक्षण, नर्सिंग गुणवत्ता आणि रुग्ण अनुभव, रुग्ण आणि कर्मचारी सुरक्षा, नर्सिंग प्रशासन आणि नेतृत्व विकास, ऑनबोर्डिंग, ओरिएंटेशन आणि कर्मचारी विकास आणि नर्स नैपुण्य यासह विविध क्षेत्रांचा समावेश आहे.

या भागीदारीद्वारे, लीलावती हॉस्पिटल निरीक्षण, रिअल-टाइम सर्वोत्तम सराव मिमांसा आणि संबंधित सत्रांद्वारे प्रशिक्षण देईल. कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर, नर्सना मेयो क्लिनिककडून पूर्णत्वाचे प्रमाणपत्र मिळेल, जे रुग्णसेवेतील उत्कृष्टतेसाठी त्यांच्या समर्पणाची कदर करेल.

लीलावती हॉस्पिटलचे स्थायी विश्वस्त श्री. राजेश मेहता आणि श्री. प्रशांत मेहता म्हणाले, आम्हाला ही अत्याधुनिक कर्करोग सेवा संस्था मुंबईत आणताना आणि आमच्या नर्सिंग कर्मचाऱ्यांचे कौशल्य वाढवण्यासाठी मेयो क्लिनिकशी सहयोग करताना खूप आनंद होत आहे. हा उपक्रम जागतिक दर्जाची आरोग्यसेवा प्रदान करण्याची आणि आमच्या रुग्णांचे आणि समाजाचे जीवन सुधारण्याची आमची वचनबद्धता अधोरेखित करतो.

दावोस, स्वित्झर्लंड येथून रेकॉर्ड केलेल्या व्हिडिओ संदेशात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांनी लीलावती हॉस्पिटल आणि मेयो क्लिनिकचे अभिनंदन केले आणि ते म्हणाले, मला खूप आनंद होत आहे की लीलावती हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटर मुंबई आणि मेयो क्लिनिक, यूएसए नर्सिंग प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सहकार्य करत आहेत. यामुळे आरोग्य सेवा क्षेत्रातच नव्हे तर मानवजातीच्या सेवेच्या मार्गावर एक नवीन प्रवास सुरू होईल. आपल्या देशातील अशा प्रकारचा पहिलाच नर्सिंग प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केल्याने नर्सिंग शिक्षणात क्रांती होईल आणि रुग्ण सेवेचा अतुलनीय दर्जा प्रस्थापित होईल. मी लीलावती हॉस्पिटलच्या नेतृत्त्वाबद्दल, त्यांच्या दूरदृष्टीबद्दल आणि मेयो क्लिनिकच्या जागतिक आरोग्यसेवा प्रगत करण्याच्या त्यांच्या वचनबद्धतेबद्दल मनःपूर्वक आभार मानतो. ही भागीदारी सहकार्याच्या भावनेचे उदाहरण आहे जी एक अर्थपूर्ण प्रभाव निर्माण करण्यासाठी, कौशल्य, स्रोत आणि सामायिक आकांक्षा एकत्र आणणारी सीमा विस्तारित करते. मेयो क्लिनिक गांधीनगर गुजरात येथील आगामी अत्याधुनिक रुग्णालयासाठी तांत्रिक भागीदारीसाठी योगदान देत असून मेयो क्लिनिकच्या ह्या सर्व उपक्रमांमुळे भारतातील आरोग्य सेवा क्षेत्रात परिचारिका, डॉक्टर्स आणि आरोग्य सेवा व्यवसायिक अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि जागतिक दर्जाची रुग्ण सेवा आणण्यासाठी चॅम्पियन ठरतील.महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांनी लीलावती हॉस्पिटलचे अभिनंदन केले आणि ते म्हणाले, लीलावती हॉस्पिटलने यूएसए मधील जगप्रसिद्ध मेयो क्लिनिकसोबत ऐतिहासिक सहकार्य केले आहे. मी लीलावती हॉस्पिटल आणि मेयो क्लिनिकद्वारे स्थापन केलेल्या कर्करोग रुग्णालयाचा संदर्भ फक्त रुग्णालयातच म्हणून नाही तर आरोग्य मंदिर म्हणून घेईन. परिचारिका या आमच्या लाडकी बहिण आहेत